**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, NOV-DEC, 2022, VOL- 10/74*

# कोल्हापूर : आर्थिक व धार्मिक पर्यटन अभ्यास

**[1]डॉ. विलास भिवाजी कांबळे, डॉ.शालिनी गुलदेवकर[2] , सुशील ठिगळे[3] & [1]आशालता विद्यासागर**

**[2]मॉडर्न कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर पुणे ०५**

**[3]सर परशुराम भाऊ महाविद्यालय पुणे ३०**

**Paper Received On:** 20 November 2022

**Peer Reviewed On:** 10 December 2022

**Published On:** 01 January 2023

***Abstract***

शहरातील धकाधकीच्या जीवनात कंटाळेला प्रत्येक व्यक्तीला आनंद घेण्यासाठी निवांतपण निसर्गसानिध्यात जावेसे वाटते म्हणून पर्यटन हा अलीकडील काळात मोठ्या प्रमाणात झपाट्याने विकसित होत आहे अनेक विकसित देशात पर्यटन व्यवसायाकडे उत्पन्नाचे साधन म्हणून प्रत्यक्ष पाहिले जाते. जगाच्या एकूण जीडीपी मध्ये आज पर्यटन व्यवसायाचे प्रत्यक्ष व प्रत्यक्ष योगदान जवळपास ०.९% इतके आहे भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये पर्यटन रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाचे एक महत्त्वाचे साधन ठरत आहे महाराष्ट्राचा विचार केलास २०१७हे वर्ष व्हिजिट महाराष्ट्र इयर म्हणून साजरे केले गेले. देश विदेशातून येणाऱ्या पर्यटकांना महाराष्ट्र समजण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

प्रस्तावना: आधुनिक काळात पर्यटन हा धंदा न राहता व्यवसाय झालेला आहे यामधून नवीन नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होऊ लागल्या आहेत १ जानेवारी १९९५ च्या जागतिक व्यापार करारामुळे आयात निर्यातीतील खुल्यापणामुळे वाहतूक मनोरंजन क्रीडा प्रवास दळणवळण क्षेत्रात मोठी वाढ होऊ लागली आहे. याचप्रमाणे युरोप खंडाप्रमाणेच आशिया खंडातील चीन हॉंगकॉंग सिंगापूर मलेशिया थायलंड व जपान या देशातील एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १२% पर्यंत वाढलेला पहावयास मिळतो. जगातील एक प्रमुख राष्ट्र म्हणून भारताकडे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून पाहावयास मिळते. भारतातील राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारची पर्यटनाची स्थळे आहेत. महाराष्ट्राच्या आर्थिक व धार्मिक पर्यटनामध्ये प्रामुख्याने मुंबई पुणे, नाशिक, औरंगाबाद, उस्मानाबाद, अहमदनगर, सातारा,

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सोलापूर, सांगली, रत्नागिरी या जिल्ह्यातील पर्यटकांची संख्या वाढत आहे. महाराष्ट्राच्या पर्यटनामध्ये कोल्हापूर जिल्हा हा अतिशय महत्त्वाचा किंवा कोल्हापूर हा पर्यटनाची पंढरी म्हणून ओळखला जातो. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये विविध प्रकारची अभयारण्य विविध प्रकारचे किल्ले, मंदिर, तलाव, सार्वजनिक उद्यान, धबधबे, वस्तूसंग्रहालय, प्राणीसंग्रहालय आहेत. त्याच पद्धतीने शेती पर्यटन इत्यादी विविधतेने नटलेली घटक निसर्गाच्या सानिध्यामध्ये असणाऱ्या सर्व गोष्टींचा समावेश कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पहावयास मिळतो, त्यामुळे देशी पर्यटकबरोबरच विदेशी पर्यटकांची संख्या ही कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अलीकडील काही काळामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यामधील शाहूवाडी पन्हाळा, करवीर, शिरोळ, हातकणंगले, आजरा, चंदगड, गगनबावडा, कागल, भुदरगड, गडहिंग्लज, राधानगरी या तालुक्यामधील पर्यटनाचा अभ्यास केलेला असून याकरता विशिष्ट गोष्टींची निवड केलेली आहे यामधील अभयारण्ये,किल्ले, तलाव, व तीर्थक्षेत्राची निवड केलेली आहे प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कोल्हापूर मधील पर्यटनाचा अभ्यास करताना निवडक गोष्टींचा अभ्यास सदर शोधनबंदामध्ये केलेला आहे.

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

उद्दिष्टे:

1 आर्थिक व धार्मिक पर्यटन याचा अभ्यास करणे.

2. आर्थिक व धार्मिक पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

3. आर्थिक व धार्मिक पर्यटन याविषयी उपाययोजना सुचविणे

कोल्हापूर जिल्ह्यातील पाच निवडक तलाव

आर्थिक व धार्मिक पर्यटन: मनुष्याला अगदी प्राचीन काळापासून स्वतःच्या प्रदेशापेक्षा वेगळ्या प्रदेशाचे आकर्षण नेहमीच राहिलेले आहे, अशा प्रदेशाला भेट देऊन त्या प्रदेशाची ओळख करून ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय गोष्टींमधला त्याचा असणारा अनुभव हा माणसाला समृद्ध करत असतो. धार्मिक स्थळांना भेट देणे हे भारतीय परंपरेमध्ये अतिशय प्राचीन काळापासून चालत आलेली परंपरा असून यामध्ये विविध मंदिरे तसेच वेगवेगळ्या धर्माविषयी असणाऱ्या धार्मिक गोष्टीशी संबंधित पर्यटन सुरू असून अशा पर्यटकांना त्यांच्या मागणीनुसार सेवा सुविधा पुरवून रोजगाराच्या संधी निर्माण करणे व आर्थिक सुबत्ता वाढवणे याचाच अर्थ

म्हणजे धार्मिक व आर्थिक पर्यटन होय. या ठिकाणी असणाऱ्या पर्यटकांना ज्यावेळेस या सेवा पुरवत असताना त्या सेवा गुणवत्तापूर्ण व व्यवस्थित योग्य भावाने असणे अपेक्षित असते. नैसर्गिक पर्यटन हा व्यवसाय व या पर्यटन संज्ञामध्ये प्रामुख्याने वेगवेगळ्या अल्हाददायी घटकांना भेट देणे तसेच वेगवेगळ्या गोष्टींची चव घेऊन व त्या भागामध्ये असणाऱ्या विशिष्ट अशा पदार्थांची चव व त्या माध्यमातून जगाला त्या भागाची ओळख कशी करताय करून देता येईल या गोष्टींचा विचार यामध्ये होतो.

तक्ता क्र.१

| अ.क्र. | तालुका | पर्यटन स्थळे |
|---|---|---|
| १ | शाहूवाडी | ५ |
| २ | पन्हाळा | ५ |
| ३ | हातकणले | ८ |
| ४ | शिरोळ | ६ |
| ५ | करवीर | ६ |
| ६ | गगनबावडा | २ |
| ७ | राधानगरी | ४ |
| ८ | कागल | ७ |
| ९ | भुदरगड | ३ |
| १० | आजरा | ५ |
| ११ | गडहिंग्लज | ५ |
| १२ | चंदगड | ४ |
| | एकूण | ६२ |

(स्रोत : दै कोल्हापूर सकाळ दि ११ सप्टेंबर २०१२ )

कोल्हापूर मधील काही निवडक तलाव:

1. **रंकाळा:** रंकाळा तलाव कोल्हापूर शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये वसलेला असून हा पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे या ठिकाणी दरवर्षी देशाच्या विविध भागातून मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देण्यासाठी व बोटिंग साठी येत असतात. या तलावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली असून हा पर्यटकांचे आकर्षणाचा नेहमीच केंद्रबिंदू राहिलेला आहे. या ठिकाणी येणारे

पर्यटकांमुळे आजूबाजूच्या परिसरातील लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध होऊन रोजगाराची समस्या सुटण्यास मदत झालेली आहे.

2. **राधानगरी:** हा प्रकल्प राधानगरी तालुक्यातील भोगावती नदीवर हा प्रकल्प उभारलेला असून हा प्रकल्प राजश्री शाहू महाराजांच्या दरदृष्टीने १९०८ प्रामुख्याने तयार करण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे ७.५ टीएमसी एवढी जलधारक क्षमता या तलावाची असून हा शेतीसाठी एक महत्त्वाचा जलसिंचनाचा उपाय म्हणून पाहिले जाते. हा तलाव प्रामुख्याने डोंगराळ प्रदेशांमध्ये असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू राहिलेला आहे

3. **वारणा प्रकल्प**: शिराळा व शाहूवाडी या तालुक्यांच्या सीमेवर हा तलाव 'वसंत सागर' या नावाने ओळखला जातो. हा तलाव वारणा नदीवर उभारला असून हा पूर्णपणे मातीचा आहे. निसर्ग, व दोन डोंगराच्या मध्ये हा तलाव असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होत असते.

4. **तुळशी प्रकल्प:** राधानगरी तालुक्यातील हा प्रकल्प ३.२ टीएमसी एवढ्या क्षमतेचा असून निसर्गामधील अतिशय योग्य ठिकाणांचे वरदान लाभलेला हा तलाव पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील अभयारण्याचा अभ्यास:**

कोल्हापूर जिल्हा हा सह्याद्रीच्या घाटमाथ्याचा काही भाग समावेश असून हा डोंगररांगांनी वेढलेला असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर निसर्ग सानिध्य तसेच अभयारण्याचाही समावेश होतो. यामधील काही प्रमुख अभयारण्याच्या पर्यटनाच्या दृष्टिकोनातून सदर शोधनिबंधामध्ये समावेश केलेला आहे

1. **गौसे** : आजरा तालुक्यातील हे जंगल असून कर्नाटक व गोवा या राज्याच्या सीमेवर आढळून येते या अभयारण्यामध्ये विविध झाडांची जैवविविधता तसेच घनदाट जंगल याचा समावेश असून अनेक राज्यांमधून अनेक पर्यटक या भेट देत असतात.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

2. **दाजीपूर**: हे जंगल सर्वसाधारणपणे समुद्रसपाटीपासून बाराशे ते तेराशे मीटर उंचीवर बसलेल्या असून कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्या सीमेवर आहे. कोल्हापूर पासून ७० ते ८० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या जंगलामध्ये प्रामुख्याने आंबा, जांभळ, हिरडा, शीसम, इत्यादी झाडांचा मोठ्या प्रमाणावर समावेश होतो. वर्षाविहारांमध्ये या जंगलामध्ये मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची संख्या पहावयास मिळते

3. **आंबा**: कोल्हापूर रत्नागिरी रोडवर अंबा हे गाव वसले असून शाहूवाडी तालुक्यातील प्रसिद्ध जंगल या ठिकाणी आहे. अंबा परिसर पर्यटनाच्या दृष्टिकोनातून व जैवविविधताच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा असून या ठिकाणी उन्हाळा हिवाळा व पावसाळा या तिन्ही ऋतूमध्ये मोठ्या प्रमाणावर पर्यटक खरेदी करतात.

**कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक किल्ल्यांचा अभ्यास:**

महाराष्ट्राला लाभलेल्या परंपरेमध्ये ऐतिहासिक वारसा म्हणजेच किल्ले होय. या ठिकाणी अनेक प्रकारचे किल्ले आपणास पहावयास मिळतात यापैकी काही प्रमुख किल्ल्यांचा अभ्यास या ठिकाणी केलेला आहे

**1. पन्हाळगड:** पन्हाळा हा किल्ला कोल्हापूर जिल्ह्यामधील प्रमुख किल्ल्यामध्ये मानला जातो. या किल्ल्याची वैशिष्ट्य यामध्ये प्रामुख्याने त्यामध्ये धान्य कोठार ,उद्यान, दरवाजा, सज्जा, दुतोंडी बुरुज तटबंदी, हिरवीगार झाडी, डोंगर, हॉटेल्स नागमोडी वळणाचे रस्ते रानमेवा तसेच विविध गोष्टींनी व निसर्गानं सानिध्याने प्रेरित झालेला हा किल्ला आहे या ठिकाणी महाराष्ट्र मधून नव्हेच तर संपूर्ण जगामधून अनेक पर्यटक या किल्ल्याला दरवर्षी भेट देत असतात.

**2. पारगड** : पारगड हा चंदगड तालुक्यातील एक अतिशय निसर्गामधील सुंदर किल्ला असून या ठिकाणी अनेक पर्यटक वर्षाविहारासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी करत असतात हा किल्ला १६७६ मध्ये शिवरायांनी आपल्या ताब्यात घेतला स्वराज्यातील पारगड किल्ला म्हणून याचे नाव प्रामुख्याने पारगड ठेवले गेले.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**3. गगनगड**: गगनबावडा तालुक्यातील हा किल्ला महत्त्वाचा असून या ठिकाणी दत्त जयंती मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते. गगनगिरी महाराज व गगनबावडा घाट यामुळे ह्या किल्ला पर्यटनाचे अतिशय महत्त्वाचे केंद्र आहे. महाराष्ट्राचे चेरापुंजी म्हणून ज्याचा ओळख म्हणून ह्या किल्ल्याची ओळख ही आहे.

**4. विशाळगड**: शाहूवाडी तालुक्यातील प्रामुख्याने सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर विशाळगड विस्तारलेला असून सह्याद्री पर्वत हे त्याचे प्रमुख त्याने कवच म्हणून किंवा बुरुंज म्हणून रक्षण करत आहे. विशाळगड हा बाजीप्रभू देशपांडे तसेच राजारामाची पत्नी अंबिकाबाई या यांच्या समाधी असून हा किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळे:** कोल्हापूरला दक्षिण काशी अशी संबोधले जाते पंचगंगेच्या काठावर अनेक छोटी-मोठी मंदिरे असून ही मंदिरे काशी या ठिकाणाची आठवण आपणास करून देतात. कोल्हापूरमध्ये असणारे प्रामुख्याने अंबाबाईचे मंदिर अनेक वर्षापासून धार्मिक तसेच धार्मिक पर्यटनाशी निगडित असून अनेक वर्षापासून अनेक पर्यटक या ठिकाणी वारंवार भेट देतात.

**1. अंबाबाई मंदिर:** पर्यटनाचे सगळ्यात महत्त्वाचे आकर्षण कोल्हापूर मधील अंबाबाईचे मंदिर असून हे प्रामुख्याने शहराच्या मध्यवर्ती भागात वसलेल्या असून यास फार प्राचीन इतिहास लाभलेला आहे याच दक्षिणकाशी असे संबोधले जाते या ठिकाणी नवरात्र तसेच नवीन वर्ष व सुट्ट्यांमध्ये प्रचंड प्रमाणात गर्दी होत असून यामधून त्या प्रदेशातील अनेक व्यवसायांना चालना मिळते व रोजगार उपलब्ध होतो.

**2. ज्योतिबा:** पन्हाळा तालुक्यातील वाडी येथे हे मंदिरासून महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यांमधील अनेक भाविकांचे हे प्रामुख्याने कुलदैवत आहे. चैत्र पौर्णिमेस या ठिकाणी फार मोठी यात्रा भरते या ठिकाणी असणाऱ्या देवालयामध्ये काळभैरव व रामलिंग ही प्रमुख मंदिरे या ठिकाणी पहावयास मिळतात.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**3. श्रीदत्त हातगंगले**: तालुक्यातील नरसिंहवाडी येथील प्रसिद्ध मंदिरा असून प्रत्येक पौर्णिमेस या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी आहे. कृष्णा नदीच्या काठावर निसर्गरम्य ठिकाणी वसलेले हे दत्त मंदिर आणि पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे विशेषत महाराष्ट्र कर्नाटक व आंध्र प्रदेश तसेच देश विदेशातील पर्यटक या ठिकाणी मोठ्या संख्या संख्येने भेट देत असतात.

**4. खिद्रापूर:** शिरोळ तालुक्यातील प्राचीन मंदिर म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो ते खिद्रापूर कोपेश्वर महादेव मंदिर या नावाने ओळखले जाते. हे मंदिर प्रामुख्याने कृष्णा नदीच्या काठावर उभे असून त्यात तीर्थक्षेत्राच्या दर्जा देण्यात आल्यामुळे भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. 108 खांबावरे मंदिर उभारले असून रामायण व महाभारतामधील अनेक प्रसंग यामध्ये कोरलेले आहेत हे मंदिर स्थापत्यशास्त्राचा अतिशय अद्भुत असा नमुना म्हणून ओळखले जाते.

**आर्थिक धार्मिक पर्यटनाचे फायदे**

1. आर्थिक पर्यटनामुळे आर्थिक विकासास मदत होते व धार्मिक पर्यटनामुळे मोठ्या प्रमाणावर लोक त्या ठिकाणी आकर्षित होऊन विविध स्वरूपाचा विविध स्वरूपाच्या गोष्टी खरेदी करून प्रत्यक्ष आर्थिक विकासास मदत करतात.

2. आर्थिक धार्मिक पर्यटनामुळे त्या ठिकाणी असणाऱ्या रोजगाराच्या संधीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असते.

3. बाजारपेठांचा विकास होण्यासाठी किंवा शेतातील असणाऱ्या विविध स्वरूपाची फुले फळे पाने यांचा व्यवसाय वृद्धी व वाढीस लागण्यासाठी धार्मिक पर्यटन अतिशय महत्त्वाची भूमिका बजावते

4. आर्थिक व धार्मिक पर्यटनामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर वाढ होते.

5. धार्मिक पर्यटनामुळे मोठ्या प्रमाणावर परदेशी पर्यटक भेट देत असल्यामुळे परकीय चलन प्रत्यक्ष व प्रत्यक्ष उपलब्ध होऊन आर्थिक प्रगती होते.

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

6. अनेक सांस्कृतिक घटकांचा विकास करण्यासाठी आर्थिक पर्यटन मदत करते.

7. धार्मिक व आर्थिक पर्यटनामुळे लोकांच्या राहणीमानात मोठ्या प्रमाणावर बदल होऊन लोकांच्या राहणीमानाच्या दर्जामध्ये सुधारणा होते .

**आर्थिक व धार्मिक पर्यटनाचे तोटे**

1. नैसर्गिक व प्राणी जीवन धोक्यात येते

2. विशिष्ट धर्माशी संबंधित असणाऱ्या गोष्टीमुळे धार्मिक तेढ वाढवून सामाजिक सुरक्षितता धोक्यात येते

3. पर्यटन व्यवसायामुळे जलप्रदूषण तसेच हवा प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते.

4. सार्वजनिक सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्न अतिशय गंभीर बनतो.

5. पर्यटकांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.

6. पर्यटन स्थळे बहुभाषिक असतील तर प्रश्न निर्माण होत नाहीत परंतु एक भाषिक असेल तर अनेक समस्या निर्माण होतात.

7. वाढत्या संख्येमुळे लोकसंख्येची घनता वाढत जाऊन त्या ठिकाणी सामाजिक गुन्हेगारी वाढण्याचा धोका निर्माण होतो

8. पर्यटन स्थळावर पर्यटकांची संख्या वाढल्यास फसवणुकीचे , चोरीचे अनेक प्रकार त्या ठिकाणी होत असतात.

**उपाय:**

1. पर्यटन स्थळी सार्वजनिक स्वच्छतेचा आदर राखून सार्वजनिक स्वच्छता कशी राहील त्याचा प्रयत्न प्रत्येक पर्यटकांनी केला पाहिजे.

2. पर्यटकांच्या गरजेनुसार व मागणीनुसार त्यांना आवश्यक असणाऱ्या सेवा सुविधा पर्यटन स्थळी पुरवल्या गेल्या पाहिजेत.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

3. पर्यटन स्थळी फिरत असताना पर्यटकांना प्रामुख्याने त्या ठिकाणी असणाऱ्या नियमाचे पालन केले पाहिजेत उदाहरणार्थ जंगलमध्ये फिरायला गेल्यास मोठ्या प्रमाणावर आवाज केल्यास त्या ठिकाणी असणाऱ्या प्राण्यांच्या अधिवासामध्ये अडथळा निर्माण होतो.

4. विविध प्रकारची अभयारण्य अलीकडील काळामध्ये वाढीस लागले असून या ठिकाणी पर्यटकांनी सार्वजनिक शांततेचा भंग होणार नाही याचा असे पालन केले पाहिजे.

5. पर्यटक हे प्रामुख्याने राष्ट्रीय उद्याने, जंगले, गवताळ प्रदेश या ठिकाणी भेट देत असतात कधी कधी आगीचे प्रसंग ही निर्माण होतात हे कसे टाळता येईल याचाही विचार केला गेला पाहिजे.

6. विविध स्वरूपाचे असणारे लेणी शिल्पे उद्याने किल्ले या ठिकाणी भेट दिल्यानंतर पर्यटक त्या ठिकाणी त्यांचे नुकसान करण्याचा प्रयत्न करतात हे टाळले गेले पाहिजे

पर्यटन हा भारतासारख्या देशांमध्ये एक व्यवसाय बनला असून ह्यामध्ये वाढ होणे अतिशय गरजेचे आहे कोल्हापूर जिल्ह्याचा अभ्यास केल्यास भविष्यकाळात हा व्यवसाय अधिक वृद्धिंगत होण्यास मोठ्या प्रमाणात वाव आहे. सरकारने यासाठी काही योजना किंवा सवलती दिल्यास पर्यटन व्यवसाय हा वाढीस लागून त्या ठिकाणच्या राष्ट्रीय उत्पन्नात भर घालण्याबरोबरच स्थानिकांना रोजगारही उपलब्ध करून देण्यास मोठा हातभार लागेल

**संदर्भसूची**

ग गे जमा करवीर्यासत १९६८
भिडे कोल्हापूर दर्शन १९७१
भारतीय पर्यटन सिंहावलोकन २०१२
साप्ताहिक सकाळ पर्यटन विशेषांक दिनांक १२ फेब्रुवारी २०२१
लोकमत हॅलो पुरवणी दिनांक २० मे २०११
दैनिक पुण्यनगरी कोल्हापूर दिनांक २७ जुलै २०१२
दैनिक पुण्यनगरी कोल्हापूर दिनांक २७ जुलै २०१२
जिल्हा परिषद कोल्हापूर २०१५
अर्थ संवाद मराठी अर्थशास्त्र परिषद प्रेमासिक जानेवारी मार्च २०१७ खंड ४० अंक ४

*Ghosh Avijit , Sutapa Mukhopadhyay, Surodeep Chatarjee (2021), "Assessment of geo-heritage and prospects of Geo-tourism: An approach to geo-conservation of important geological and geomorphological sites of Puruliya district, West Bengal, India"*

*Nicole Boivin: ( 2015) "Rock art and rock music: Petroglyphs of the south Indian Neolithic" Percy*

१२. *Mabvuto Ngwira, Embassy of the Republic of Zambia and Permanent Mission to UNWTO & UNESCO – "A Review of Geo-tourism and Geoparks: Is Africa Missing out on this New Mechanism for the Development of Sustainable Tourism?"*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*